# बालशिक्षणाचा नवा आधार

एकविसाव्या शतकाच्या सुरुवातीला, बालशिक्षणविषयक काही विचार आपण नव्याने करू पाहत आहोत. आजवरच्या बालशिक्षणाला तत्त्वज्ञानाचा नि नंतर मानसशास्त्राचा आधार घेतला होता. आता मात्र आपल्याला त्यांच्याच जोडीला मज्जाशास्त्राचाही आधार घ्यायला हवा. कारण, बालकाविषयीची खूप नवी शास्त्रीय माहिती हे शास्त्र आपल्याला देत आहे. उदाहरणार्थ, सहा - सात वर्षांपर्यंतच्या कालात, बालकाच्या मेंदूतील मज्जातंतूचे बांधले जाणारे जाळे, वेगवेगळया विकासाच्या अवस्थांमध्ये, घडून येणाऱ्या मज्जापेशींच्या वेगवेगळया रचना, भाषिक, गणिती किंवा तार्किक, अवकाशीय, सांगितिक, शरीरस्नायूविषयक अशा विविध प्रकारच्या बुद्धिमत्तांच्या अस्तित्वाची, मेंदूमध्ये असणारी अलग-अलग स्थाने, सर्व भाषिक प्रतिकांचा व्यवहार मेंदूमध्ये एका विशिष्ट पद्धतीनेच साकार होतो, आणि तो गणिती-तार्किक व्यवहारांपेक्षा वेगळया पद्धतीने होतो, याविषयीची मज्जाशास्त्राने केलेली स्पष्टता, या सर्व शास्त्रीय बाबी, आपल्याला बालशिक्षणात नवी दिशा दाखवायला सज्ज झाल्या आहेत. या माहितीने एक प्रकारची आकलनाच्या क्षेत्रात क्रांतीच घडवून आणली आहे. अर्थात, मेंदूविषयक म्हणजे मज्जाशास्त्रीय संशोधनाची कास धरतानाच आपल्याला याच आकलन क्रांतीत आणखी एका दिशेने झालेल्या संशोधनाचेही भान ठेवायचे आहे. पियाजेनंतर एक प्रकारची आकलनाच्या क्षेत्रात क्रांतीच घडवून आणली आहे. अर्थात, मेंदूविषयक म्हणजे मज्जाशास्त्रीय संशोधनाची कास धरतानाच आपल्याला याच आकलन क्रांतीत आणखी एका दिशेने झालेल्या संशोधनाचेही भान ठेवायचे आहे.

पियाजेनंतरच्या काळात, विकासक मानसशास्त्रात हॉवर्ड गार्डनर यांच्या सारख्यांनी मज्जाशास्त्रीय संशोधनाची भर घातली आणि शिक्षणाला एक नवे परिमाण प्राप्त करून दिले आहे. आणखी अशीच भर घातली आहे ती, मानवी संस्कृतीच्या संकल्पनेच्या अधिष्ठानाने. आता असे दिसून आले आहे की, मानवनिर्मित संस्कृतीचा, व्यक्तीच्या मज्जासंस्थांशी जो संकर होतो, तो आपल्याला टाळून चालणार नाही. सोव्हिएट मानसशास्त्रज्ञ लेव वायगोट्स्की आणि त्याचे अमेरिकेतील चाहते मानसशास्त्रज्ञ जेरोम ब्रुनर नि मायकेल कोल यांचे कार्य यासंबंधात महत्त्वाचे आहे. या सर्व विचारवंतांनी असे दाखवून दिले आहे की, मानवी मनाचा व्यक्तीकेंद्री दृष्टिकोणातून विचार करणाऱ्या पियाजे वा चॉम्स्की यांच्या विवेचनाला एक मोठी मर्यादा आहे. ती म्हणजे, त्यांनी, मानवी संस्कृती या बाह्य घटकाचा मानवी मनाच्या विकासावर होणारा परिणाम आपल्या विश्लेषणात, विचारात घेतलेला नाही. आपण ज्याविषयी बोलतो आहोत, त्या मानवी संस्कृतीच्या संकल्पनेत प्रामुख्याने दोन गोष्टींचा समावेश होतो. एक म्हणजे, मानवाने, हजारो वर्षांच्या आपल्या प्रगतीत निर्माण केलेल्या भौतिक सुधारणांचे उभारलेले जग आणि दुसरे म्हणजे, व्यक्तीविकासाशी संबंधित असणारे माणसा-माणसांमधील परस्पर संबंधांचे जग. आता आपल्याला नव्याने अशी जाणीव झाली आहे की, ज्याला आपण माणसाचे 'मन' असे म्हणतो त्याचे स्थान जेवढे मेंदूमध्ये असते तेवढेच ते सांस्कृतीच्या विकासात आणि संबंधित व्यक्तींच्या वागणुकीतही असते. त्यामुळे एका बाजूला 'आकलनशक्तीद्वारे होणारे शिक्षण जसे आपण विचारात घ्यायला

हवे, तसेच त्याच्या जोडीला, 'संस्कृतींकरवी होणारे शिक्षणसुद्धा लक्षात घ्यायला हवे. विकासक मानसशास्त्राच्या क्षेत्रात गेल्या शतकात घडून आलेल्या 'आकलन क्रांती' चा म्हणजेच नवीन संशोधनाचा आढावा आपल्यासमोर मांडला, कारण, आपण सगळेजण बालशिक्षणाचा विचार करायला उद्युक्त होत आहोत. बालशिक्षण स्वतंत्रपणे विचारात घेऊन, त्यात इष्ट बदल कसे घडवून आणायचे, हा आपल्यापुढचा प्रमुख प्रश्न आहे. पण एवढेच पुरेसे नाही. एकूण शिक्षणातील परिवर्तनाचा पाया, म्हणूनही बालशिक्षणातील क्रांतिकारक बदलांविषयी, आपल्याला विचार करायला हवा.

थोडक्यात, आपल्याला बालशिक्षणाच्या तत्त्वांची नि व्यवहारांची नव्याने मांडणी करायला हवी आहे आणि त्यासाठी आधाराला आपण, अलीकडच्या काळातील संशोधन आपल्यापुढे ठेवतो आहोत. हे संशोधन आहे ते जीवशास्त्रात, मज्जाशास्त्रात, मज्जामानसशास्त्रात आणि त्यांच्याशी संबंधित अशा शास्त्रोपशास्त्रांत झालेले, होत असलेले संशोधन होय. या बरोबरीने अर्थातच, बालकाच्या भावी आयुष्याच्या गरजाही भावीकालशास्त्राच्या आधारे आखून घ्याव्या लागतील. आता आपण, या नवसंशोधनांतून शिक्षणविषयक परिवर्तनाला उपयोगी पडतील अशी काही सूत्रे ठळकपणे मांडू या.

**बालशिक्षणासाठी काही सूत्रे**

१. मेंदूविषयक नव्याने जी जाण आपल्याला आली आहे, त्यावरून एका गोष्टीला नव्याने दुजोरा मिळाला आहे. ती म्हणजे, विशेष करून बाल्यावस्थेत, ज्ञानसंपादनाच्या प्रभावी प्रक्रियेसाठी 'अनुभवाचे स्थान फार मोठे, किंबहुना अनिवार्य असे आहे. कृतिशील अनुभव हाच, म्हटले तर, आकलन क्रांतीमधील कळीचा मुद्दा आहे.

२. मेंदूमधील पेशींची विशिष्ट बांधणी किंवा संरचना पुरेशी नाही, तिच्यातील विविध क्षमतांच्या केंद्रांना सतत उत्तेजित ठेवतील असे ज्ञानेंद्रियांचे नि मानसप्रतिमानिर्मितीचे अनुभव, अगदी बालपणापासून देण्याची आवश्यकता आहे. तसे दिले गेले तर क्षमता विकास पावतात. आणि न दिल्यास, म्हणजे वापर न केल्यास त्या क्षमता गळून पडतात.

३. मेंदूचे कार्य एखाद्या यंत्राप्रमाणे होत नाही. त्यातही वेगवेगळी केंद्रे नि त्या केंद्रांची मज्जातंतूची विशिष्ट जाळी, स्वतंत्रपणे कार्यान्वित होत असतात. आणि त्यातून वेगवेगळया बुद्धिमत्तांची किंवा क्षमतांची कार्ये चालू राहतात. त्यामुळे, एखादी मुलगी किंवा मुलगा विशिष्ट बुद्धिमत्तेच्या क्षेत्रात तेज आढळेल तर दुसऱ्या कुठल्या क्षमतेच्या बाबतीत कमी असलेला जाणवेल. असे जवळजवळ प्रत्येकाच्याच बाबतीत घडेल.

४. लहान वयातील काही विशिष्ट क्षेत्रातील कृतिशीलता इतर क्षेत्रांची कार्यक्षमता दुणावणारी ठरू शकेल. याबाबत अजून अभ्यास होणे गरजेचे असले तरीही एक गोष्ट, सामान्यपणे सिद्ध झाली आहे ती अशी की, बालकांना लहान वयात संगीताचे धडे दिले, एखादे वाद्य वाजवायला प्रवृत्त केले तर या सांगितिक अनुभवांचा चांगला परिणाम इतर बुद्धिमत्तांच्या विकासाबाबत दिसून येतो.

५. भावनिक विकासाचे स्थान बालशिक्षणात महत्त्वाचे मानले पाहिजे. प्रेममय, सोहार्दाची वागणूक, सहाकाराची भावना, परस्परांच्या भावनांशी एकरूप होणे, सहानुभूती , करूणा या गोष्टींचा मनःपटलावर

होणारा परिणाम दीर्घकालीन असतो. साधारणपणे, दहा बारा संख्येपर्यंतच्या मुलांच्या गटातच अशा प्रकारचा भावनिक विकास प्रभावीपणे साधता येतो. त्यामुळे बालशिक्षणाच्या दैनंदिन व्यवहारात गटपद्धती अनिवार्य ठरते.

६. सर्वच मुले विकासाच्या विविध टप्प्यांमधून अनुक्रमाने जात असली तरीही, त्यासाठी त्यांना विकासानुरूप अनुभवांचा पुरवठा करावा लागतो, शिवाय वेगवेगळी मुले विकासाच्या वेगवेगळया टप्प्यांवर असताना, त्यांना द्यावयाचे अनुभव वेगवेगळे असावे लागतात. त्यामुळे दैनंदिन बालशिक्षणाचे रूप, वैयक्तिक शिक्षण असेच ठरते.

७. प्रत्येक बालकाला उपजत लाभलेला बुद्धिमत्तांचा पट वेगवेगळा असतो, आणि त्यांचा शोध घेणे हे वयाच्या सातव्या आठव्या वर्षापर्यंत शक्य असते. ज्याला ज्या बुद्धिमत्ता तीव्रतेने प्राप्त झालेल्या असतात, त्या क्षेत्रात भविष्यात काम करण्याचा त्याचा कल असतो, त्यात त्याला गती असते आणि रसही असतो. त्यामुळे बुद्धिमत्तांच्या शोध घेऊन, त्याला खतपाणी देण्याची तयारी बालशिक्षणात सुरू करता येते.

८. लहान वयातच मुलांच्या सबलता नि निर्बलता ओळखणे फायद्याचे असते. सबलता ओळखून त्यानुसार त्याला कोणत्या प्रकारच्या अनुभवांची विशेष गरज आहे हे ठरवता येते, तर दुर्बलता माहीत झाल्याने, आवश्यक तर त्यांवर वेळीच उपाययोजना करता येते. एवढेच नव्हे तर, दुर्बलतांनाच कमी महत्त्व देऊन, त्यांच्यामुळे वृथा निर्माण होणारे ताणही टाळता येतात.

९. शाळांतील एकच अभ्यासक्रम, एकाच पद्धतीने, एकाच वेळी सर्व विद्यार्थ्यांना शिकविणे, आणि त्या सर्वांचे एकाच वेळी, एकाच पद्धतीने मूल्यमापन करणे, ही गोष्ट विद्यार्थ्यांवर अन्याय करणारी आहे. त्यात परिवर्तन करून, शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करायचे असेल तर शिक्षणाचे व्यक्तिविशिष्टीकरणही करावे लागेल. व्यक्तिविशेषांची दखल घेणारी मूल्यमापन पद्धती ठरवावी लागेल.

१०. मूल संस्कृतीच्या विकासाच्या ज्या टप्प्यावर या जगात प्रवेश करते, त्या टप्प्यापर्यंतच्या संचित अशा सांस्कृतिक बाबींचा लाभ आपसूकच त्याला मिळतो. तसेच, जन्मापासून विस्तारत जाणारे संबंधित व्यक्तींचे जग, बालकाच्या आकलन प्रक्रियेत महत्त्वाचा वाटा उचलत असते. त्याचा लाभ करवून घेण्यासाठी मुलांच्या सामाजिक संपर्काला बालशिक्षण व्यवहारात महत्त्वाचे स्थान दिले पाहिजे.

११. बालकाचे आजचे शिक्षण हे त्याच्या उद्यासाठीचे शिक्षण असते. त्यामुळे ते त्याच्या भावीकालाशी जोडलेले असते. बालकाच्या निसर्गदत्त बुद्धिमत्ता, आणि भावीकालातील त्याच्या अपेक्षित गरजा नि बदलती परिस्थिती यांचा मेळ घालूनच व्यक्तीशिक्षणाचा विचार करणे शक्य होते.

१२. शेवटी, फ्राईडने म्हटल्याप्रमाणे, हेही आपण ध्यानात ठेवले पाहिजे की, बाल्यावस्थेतील पहिली पाच वर्षे बालकाच्या भावी आयुष्यावर निर्णायक परिणाम करणारी असतात, आणि नंतरच्या काळातील विरोधी घटनाही त्यात फारसा बदल करत नाहीत. बालशिक्षणाचा आजवरचा इतिहासही हेच सांगत आला आहे.

❖